# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक २० /१०/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०५ सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०९/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.** | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०९/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | **प्रश्नोत्तरे** | - |
| ३. | **शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव.** | सदरचा विषय माहितीसाठी आहे. |
| ४. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई नालासोपारा आस्थापनेवरील कर्मचारी श्री.दयानंद दिवान सरबटा, सफाई कामगार यांना रुग्णता निवृत्ती देणेबाबत.** | ठराव/ निर्णय :- मा.जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांनी **श्री.दयानंद दिवान सरबटा,सफाई कामगार** हयांना मधुमेह या आजाराचा त्रासाने त्याचे दोन्ही पाय निकामी झाले असल्याने ते शारिरीकदृष्टया काम करण्यास असमर्थ आहेत असे प्रमाणपत्र क्र.जिल्हा शल्य चिकित्सक पालघर CHP/MED/०५/१८दि.१८/०१/२०१८ अन्वये कळविलेले आहे. त्यानुसार **श्री.दयानंद दिवान सरबटा,सफाई कामगार** प्रभाग समिती ई नालासोपारा यांना महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १९८२ नियम ८० अन्वये रुग्णता निवृत्त करणेस मान्यता देत आहे . **श्री.दयानंद दिवान सरबटा,सफाई कामगार** यांना रुग्णता निवृत्ती नंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (किशोर ग.पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | **श्रीमती स्मिता भोईर, प्रभारी सहाय्यक आयुक्त, नालासोपारा यांचेप्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावर निर्णय घेणेबाबत.** | ठराव/निर्णय :- अपचारी श्रीमती स्मिता भोईर हे नियम वयोमानानुसार दिनांक ३० जुन, २०१८ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. विभागीय चौकशी अधिकाऱ्याने त्या निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे. अशा परिस्थितीत चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मान्य करण्यांत येऊन अपचारी श्रीमती स्मिता भोईर यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय ही महासभा घेत आहे. प्रशासनाने त्यानुसार आवश्यकती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असा निर्देशही महासभा देत आहे.<br>अनुमोदक :- (सुदेश चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ६. | श्री. नरेंद्र निवृत्ती जगताप, लिपिक - टंकलेखक, यांचेप्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावर निर्णय घेणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** **श्री. नरेंद्र निवृती जगताप, लिपीक-टंकलेखक यांना विभागीय चौकशीचे अधिन राहून आदेश जावक क्र. वविशम/आस्था/९८८/१३-१४, दि. १४/०२/२०१४ पासुन सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे.** अपचारी श्री. नरेंद्र निवृत्ती जगताप, लिपीक-टंकलेखक यांना विभागीय चौकशी अधिकाऱ्याने ते निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे. अशा परिस्थितीत चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मान्य करण्यांत येऊन अपचारी श्री. नरेंद्र जगताप यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय ही महासभा घेत आहे. प्रशासनाने त्यानुसार आवश्यकती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असा निर्देशही महासभा देत आहे.<br>**अनुमोदक :- (वैभव पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | श्रीमती संध्या सुधीर सबनीस, सहाय्यक अंतर्गत लेखापरिक्षक यांचेप्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावर निर्णय घेणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** अपचारी श्रीमती संध्या सुधीर सबनीस, सहाय्यक अंतर्गत लेखापरिक्षक यांची विभागीय चौकशी अधिकाऱ्याने त्या निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे. अशा परिस्थितीत चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मान्य करण्यांत येऊन अपचारी श्रीमती संध्या सबनीस यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय ही महासभा घेत आहे. प्रशासनाने त्यानुसार आवश्यकती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असा निर्देशही महासभा देत आहे.<br>**अनुमोदक :- (किशोर ग.पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | श्री. सुखदेव चत्रुलाल दरवेशी, स्वच्छता निरिक्षक यांचेप्रकरणी विभागीय चौकशी अधिकाऱ्याने दिलेल्या अहवालावर निर्णय घेणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** श्री. सुकदेव दरवेशी यांना विभागीय चौकशीच्या अधिन राहून दि. २५/०३/२०१० च्या आदेशान्वये सेवेत पुन:स्थापीत करण्यात आले आहे. अपचारी श्री. सुकदेव च. दरवेशी यांना विभागीय चौकशी अधिकाऱ्याने ते निर्दोष असल्याचा अहवाल दिला आहे. अशा परिस्थितीत चौकशी अधिकाऱ्याचा अहवाल मान्य करण्यात येऊन अपचारी श्री. सुकदेव दरवेशी यांना दोषमुक्त करण्याचा निर्णय ही मा. महासभा घेत आहे. प्रशासनाने त्यानुसार आवश्यकती नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, असा निर्देशही मा. महासभा देत आहे.<br>**अनुमोदक :- (भुपेंद्र पाटील ) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये गोवर रुबेला (Measles Rubella) मोहिम माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये | ठराव / निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये गोवर रुबेला (Measles Rubella) मोहिम माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये राबविण्यात येत असल्याबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये (९ महिने ते १५ वर्षापर्यंत) वयोगटातील सर्व बालकांना गोवर रुबेला (Measles Rubella) मोहिम माहे २७ |

| | | |
|---|---|---|
| | राबविण्यात येत असल्याबाबत. | नोव्हेंबर २०१८ पासून राबविण्यात येणार असुन या मोहिमेमध्ये (९ महिने ते १५ वर्ष) वयोगटातील सर्व बालकांचे लसीकरण करणेस व सदर मोहिमेबाबत समाजामध्ये जागरुकता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी तसेच मोहिमेच्या यशस्वीरीत्या आयोजनाकरीता (आरोग्य, शिक्षण व माता बाल विकास विभाग) विभाग प्रमुख, अध्यक्ष आय.ए.पी/आय.एम.ए/गटशिक्षणाधिकारी तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक व पालक, लोकप्रतिनिधीचा सहभाग अत्यंत आवश्यक राहील. या मोहिमेकरीता आवश्यक सुक्ष्मकृती आराखडा, इंधन व वंगन, शितसाखळी, पर्यवेक्षणाकरिता मोबेलिटी, प्रशिक्षण, बैठक, प्रसिध्दी, लसिकरणानंतर कचऱ्याची विल्हेवाट/व्यवस्थापन, छपाई, इतर खर्च, सादील खर्च असे एकूण रु.३०.६४ लक्ष इतके अनुदान शासनाने मंजूर केले आहे. तरी उक्त प्रकरणी मंजूर ठेक्यामध्ये असलेल्या बाबींबाबत ठेक्यामधील दरानुसार खरेदी करणेस व मंजूर नसलेल्या बाबी ई-निविदा/दरपत्रक मागवून उपलब्ध करुन घेणेस ही सभा मान्यता देत असून याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत परिवहन सेवेसाठी विरार (प) व राजावली वसई (पूर्व) येथे बसडेपो बांधणेकामी ठेकेदाराने केलेल्या नुकसान भरपाईसाठीच्या मागणीवर डिसप्यूट ॲडज्यूडीकेशन बोर्डाकडून प्राप्त झालेल्या निवाडयाच्या निर्णयाबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वरील प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर बाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने नेमण्यात आलेल्या डी.ए.बी च्या अहवालाचे अवलोकन केले. डी.ए.बी ने दिलेल्या निवाडयानुसार मे.एन.ए.कन्स्ट्र.प्रा.लि.कं. यांना एकुण रुपये ३.६८ कोटी इतकी रक्कम नुकसान भरपाई रक्कम अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | **वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत परिवहन सेवेसाठी यशवंत नगर, विरार (प.) येथील बस डेपो इमारतीच्या वाढीव कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत परिवहन सेवेसाठी यशवंत नगर, विरार (प.) येथील बस डेपो इमारतीच्या वाढीव कामाच्या [५,६ व ७ वा मजला + (G+७) चे अंतर्गत काम] होणाऱ्या रक्कम रु.९२,०७,७९,०९७/- च्या खर्चास मा.आयुक्त ह्यांनी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन निविदा मागविणे कामी शिफारस केलेली आहे. तरी सदर इमारतीच्या उर्वरीत तीन मजल्यांचे आर.सी.सी बांधकाम व (G+७) मधील अंतर्गत कामास होणाऱ्या रक्कम रु.९२,०७,७९,०९७/- इतक्या रक्कमेच्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच सदर कामाच्या अंदाजपत्रकास सक्षम विभागाची तांत्रिक मंजुरी घेवून ई निविदा मागविण्यात याव्यात असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे कामी विचार विनिमय करणे. | **ठराव/निर्णय :-** वसई - विरार शहर महानगपालिकेच्या आस्थापनेवरील नियमित वेतनश्रेणीवरील कायम कर्मचारी, महानगरपालिकेत वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना सन २०१७-१८ मधील प्रत्यक्ष कामकाजाचे २६१ दिवस विचारात घेऊन रु. ११,०८८/- रक्कमेच्या मर्यादेत सानुग्रह अनुदान देण्यात यावे. ठोक वेतनावर कार्यरत कर्मचारी, प्रकल्प अधिकारी, समुह संघटक, पेल्हार धरणावरील २५६ - ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका हद्दीत कार्यरत कर्मचाऱ्यांना तसेच इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटीअंतर्गत कार्यरत कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांना (आर.सी.एच.) माहे मार्च २०१८ मध्ये प्रत्यक्ष अदा झालेले वेतन / मानधन किंवा सानुग्रह अनुदानाची रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम सानुग्रह अनुदान म्हणुन अदा करणेस आजची ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. सन २०१८ चे दिवाळी सणानिमित्त द्यावयाचे सानुग्रह अनुदानापोटी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा वित्तीय व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (वृंदेश (उमा पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३. | सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये महानगरपलिका हद्दीतील जि.प. शाळेत शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना आवश्यकते नुसार शैक्षणिक साहित्य वाटप करणेबाबत. | सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून महिला व बालकल्याण विभागाने शिफारस केल्यानुसार सन २०१९-२० या वर्षा करिता जि.प शाळेतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दप्तर, बुट /सॅन्डल,सॉक्स, रेनकोट,ड्राईंग कलरपेटी १२ शेड ड्राईंग कलरपेटी कॅमलीन २४ शेड, कंपास बॉक्स, ड्राईंग बुक , पेन्सील,पट्टी टुथब्रश,वहया ८४ पृष्ठ,१८०पृष्ठ ई. साहित्य वाटप करण्यात यावे. सदरचा साहित्य वाटपासाठी होणा-या खर्च हा सन २०१९-२० चा मंजूर होणा-या तरतूदीतुन करण्यात यावा. सदरचे साहित्य खरेदी कामी ई निविदा प्रक्रिया करण्याकरिता व येणा-या २,००,००,०००/- (दोन कोटी रुपये) पर्यंतच्या खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (माया चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४. | सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता महिला व मुलींना व्यवसायीक व तांत्रिक प्रशिक्षण देणेबाबत. | **निर्णय :-** सदरच्या विषयांवर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असुन महिलाबालकल्याण समितीने शिफारस केल्यानुसार सन २०१६-१७ मध्ये १५ विषयांचा प्रशिक्षण निविदे बाबत कार्यवाही न झाल्याने प्रशिक्षणा बाबत कार्यक्रम न झाल्याने प्रशिक्षण रद्द करण्यात येत असुन संबधित ठेकेदारांची इसारा रक्कम परत करण्यात यावी.तसेच महिलांचे सक्षमीकरण व व्यवसाय होण्याच्या दृष्टीने महिलांना व मुलींना विविध विषयाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.यामधील बाब क्र. १,२,१० व ११ मधील प्रशिक्षणासाठी येणारे महिलां व मुलीं यांना वयाची मर्यादा १८ ते ४० वर्षे पर्यंतच मर्यादित असावी. एका कुटूबांतील दोन लाभार्थ्यांना या प्रशिक्षणाचा लाभ देण्यात यावा तसेच एका विषयाशी निगडीत असल्यास दुसरा विषय असे एकुण दोन विषयाचे प्रशिक्षण एका लाभार्थ्यांला देण्यात यावे. तसेच याकरिता प्रत्येक विषयाकरिता स्वतंत्र्य ई-निविदा फॉर्म प्रक्रिया तयार करुन शासकीय, |

| | | |
|---|---|---|
| | | निमशासकीय, खाजगी व वैयक्तीक प्रशिक्षण संस्था,तसेच इच्छुक ठेकेदार यांच्या कडुन ई-निविदा मागविण्यात यावी याकामी एकुण १५ विषयांचा प्रशिक्षणा करिता अदांजे येणा-या रु. १,३५,००,०००/- (एक कोटी पस्तीस लाख रुपये) खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- (माया चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १५ | **कचरामुक्त शहराना तारांकित मानांकन (Star Rating) मिळणेबाबत.** | **प्रस्तावाचा ठराव /निर्णय :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. याकामी घोषणा पत्राच्या आधारावर वसई-विरार शहर **महानगरपालिके**चे "3" तारांकित मानांकन ठरविण्यासाठी व ODF+Certification हगणदारी मुक्त शहरांसाठी सर्वसाधारण सभेमार्फत वसई-विरार शहर महानगरपालिकेला 3 इतके तारांकित मानांकन मंजूर करुन राज्य शासनास मंजुरीसाठी पाठविणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव**

**वसई विरार शहर महानगरपालिका**